Vol 2 Issue 3 Sept 2012

ISSN No :2231-5063

# International Multidisciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**Welcome to GRT**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2231-5063**

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.


## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University


**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.org**

Golden Research Thoughts
Volume 2, Issue. 3, Sept. 2012
ISSN:-2231-5063

Available online at www.aygrt.net

ORIGINAL ARTICLE

# मोगलकालीन चित्रकला : एक अभ्यास

गौतम गोविंद सोनवणे

सह–प्राध्यापक, इतिहास विभाग, एस.बी.कॉलेज, शहापूर, जि. ठाणे.

सार :– प्रस्तूत लेखांमध्ये संशोधकाने मोगलकालीन चित्रकलेच्या विकासाचा आढावा घेतला आहे. यामध्ये बाबर ते औरंगजेब या मोगल बादशहांच्या काळात चित्रकलेचा विकास व ऱ्हास कसा होत गेला, याचा सविस्तर अभ्यास केला आहे.मोगल संस्थापक बाबराच्या काळात चित्रकलेचा उदय झाला. सम्राट अकबराच्या काळात ही कला पूर्णतः विकसीत झाली तिने राष्ट्रीय रुप धारण केले. सम्राट जहांगीरचा काळा मोगल चित्रकलेचे सुवर्णयुग होता. शहाजहानच्या काळापासून चित्रकलेला उतरती कळा लागली. औरंगजेबाने चित्रकलेला विरोध करुन चित्रकारांना हाकलून दिले. नंतरच्या काळात मोगल चित्रकलेचे पतन झाले.

**Keywords:** चित्रकला, बादशहांची चित्रे, दरबारी चित्रे, शिकार चित्रे, बाग–बगीचे, फळे, फुल. झाडे.

### *प्रस्तावनाः–*

मध्ययुगीन भारतीय चित्रकलेच्या इतिहासात मोगल चित्रकलेला एक स्वतंत्र स्थान आहे. ही शैली प्राचीन चित्रशैलीहून कांहीसी भिन्न शैली आहे. तिचा अविष्कार स्वतंत्र असला तरी अंतरंग भारतीय आहेत. मोगल चित्रकलेचे मूळ, स्वरुप आणि विकास मोगल स्थापत्य कलेसारखाच आहे. मोगलांच्या चित्रकलेत भारतीय व इराणीशैलीचा समन्वय झाल्याचे दिसते. मोगलांनीच प्रथम भारतात इराणी चित्रकला आणली. सुरुवातीला मोगलांना भारतीय शैलीचे ज्ञान नव्हते. कालांतराने त्यांचा भारतातील राजपूत शैलीशी संबंध आला. आणि इराणी राजपूत शैलीच्या संगमातून मोगल चित्रकलेचा जन्म झाला.

मोगलकालीन चित्रकलेबाबत सर जदूनाथ सरकार म्हणतात – "प्रारंभी मोगल काळात चित्रकला इराणी होती. नंतर मोगल व राजपूत या दोन्हींचे मिश्रण होऊन मोगल चित्रशैली उदयाला आली." मोगल कालखंडात व्यक्तिचित्रे, भित्तीचित्रे, पशूपक्षांची चित्रे, फुलांची चित्रे, ऐतिहासिक चित्रे, धार्मिक ग्रंथाची चित्रे, बागबगीचे चित्रकलेचे मुख्य विषय होते.1

### *संशोधनाची उद्दीष्टेः–*

प्रस्तूत संशोधनाचे खालील उद्दीष्टे ठेवण्यात आली आहेत.

1.मोगलकालीन चित्रकलेचा उदय आणि विकास कसा झाला ते षोधने.
2.मोगलकालीन चित्रांची विषय तपासणे.
3.मोगलकालीन चित्रकलेचा शेवट तपासणे.

### *चित्रकलेचा अर्थः–*

रंगविलेल्या आकारातून साधलेली कलाकृती म्हणजे चित्र होय. रंगविण्याच्या प्रक्रियेत चित्र घडले जाते. रेखन आणि रंगलेपण या दोन्ही क्रिया यात अंगभूत असतात. इंग्रजी भाषेतील 'पेंटींग' या शब्दाचा अर्थ रंगविण्याच्या

**Please cite this Article as :** *गौतम गोविंद सोनवणे , मोगलकालीन चित्रकला : एक अभ्यास* **: Golden Research Thoughts (Sept. ; 2012)**

क्रियेपूरताच मर्यादित आहे. पण चित्रकलेच्या क्षेत्रात लेपनाची क्रिया, रंग–कुचलापण चित्रकलेच्या फलकादी माध्यम साधनांची गुणवत्ता, कलावंताच्या भाव जाणिवांचे चित्राकृतीतील प्रतिबिंब इ. सर्व प्रक्रियांचा अंतर्भाव 'पेंटींग' या संज्ञेत होतो. मराठी भाषेत 'चित्रकला' ही संज्ञा याच अर्थाने वापरली जाते. मानवी भाव जाणीवांच्या निखळ अविष्कारासाठी अवतरणारे रंगलेपणाचे प्रकार चित्रकलेत मोडतात. शिलारेषावर रेघोट्या ओढणाऱ्या अश्मयुगीन मानवाने अपाततः चित्रकलेचा पाया घातला.[2]

चित्र म्हणजे काहीतरी नेत्रदिपक, असामान्य, आश्चर्यकारक, आकाश किंवा स्वर्ग. आणि चित्रकर्मा म्हणजे चमत्कार करुन दाखवणारा कलावंत होय. कलावंताच्या मनावर दृश्य विश्वातील वस्तूंचा, विशेषतः त्याच्या आकाराचा, भावनात्मक परिणाम होत असतो. त्याच्या आंतरमनात भावगर्भ आकृती प्रदीप्त होत असते. चित्रकलेचे अनेक प्रकार आहेत. तैलचित्रे, जलरंगचित्र, मेणरंगचित्र, रंगशलाका चित्र, भित्तीचित्र, लघूचित्र, व्यक्तिचित्र, निसर्गचित्र, सागरचित्र, वस्तूचित्र, ऐतिहासिक, पौराणिक इ.

इंग्रजीत कलेसाठी 'आर्ट' हा शब्द वापरला जातो. हा शब्दप्रयोग प्रथम 13 व्या शतकात वापरण्यात आला होता. त्यावेळी हा शब्द केवळ कौशल्य या अर्थाने वापरला होता. त्यानंतर 17 व्या शतकात वास्तू, मूर्ती, चित्रण, काव्य, संगीत, नृत्य या सर्वांना उद्देशून 'कला' शब्दाचा प्रयोग होऊ लागला.

मानवी आत्म्याला आनंदाने प्रसन्न करणारी अभिव्यक्ती म्हणजे कला होय. प्राचीन काळी ही कला दगड, वाळू, विट, चून्यातून विकसीत झालेली दिसते. कला ही मानवी भावना आणि विचाराचे द्योतक आहे. कलेचा संबंध मानवाच्या दैनंदिन जीवनाशी आहे. भारतीय कलेचे मूळ धर्मात आहे. कारण भारतीय धर्माने मनुष्याचे सारे जीवन व्याप्त केले आहे. धार्मिकताच भारतीय कलेचे पहिले वैशिष्ट्ये मानले जाते. भारतीय कलाकारांनी कलेद्वारा भावनांना अधिक महत्त्व दिले आहे.

### *मोगल संस्थापक बाबरकालीन चित्रकलाः–*

मोगलांच्या पूर्वजांना चित्रकलेत फारसी रुची नव्हती. म्हणून त्यांनी चित्रकलेला उत्तेजन दिले नाही. परंतु मोगलांचा संस्थापक बाबर ललित कलांचा भोक्ता होता. त्याच्या प्रोत्साहनाने एक सुंदर चित्रकला जन्माला आली. तिलाच मोगल चित्रशैली म्हणतात. बाबर भारतात येण्यापूर्वी बिहजाद या पर्शियन चित्रकाराच्या संपर्कात आला होता. त्यानेच पर्शियन चित्रकलेला भारतात विकसीत करण्याचा प्रयत्न केला. बाबराबरोबर पर्शियन कला भारतात आली. अनेक पर्शियन चित्रकार भारतात आले होते. त्यांचे पर्शियन कलेवर प्रचंड प्रेम होते. नितांत श्रद्धा होती. या शैलीत लाल आणि निळ्या रंगाचा वापर मोठ्या प्रमाणात जाणवतो. ही शैली अलंकार प्रधान होती. बाबराच्या काळात या शैलीचा संबंध राजपूत शैलीशी आला आणि त्यातून मोगल चित्रकलेचा उदय झाला.

बाबराचे निसर्गप्रेम विशेषतः रंगीबेरंगी सौदर्यावर अधिक होते. त्याने आपल्या दरबारात अनेक चित्रकारांची नियुक्ती केली होती. त्याच्या चित्रकलेबद्दलची माहिती "बाबराच्या आठवणी" या ग्रंथात पहावयास मिळते. शहा मुजफ्फर हा प्रसिद्ध चित्रकार बाबराच्या दरबारात होता. बाबराजवळ 240 सुंदर चित्रे असल्याचा उल्लेख 'तुजूक – ए – बाबरी' मध्ये आला आहे.[3]

### *हुमायुनकालीन चित्रकला –*

बाबराचा पूत्र बादशहा हुमायूनलाही चित्रकलेची विशेष आवड होती. हुमायुन त्याच्या धामधूमीच्या काळात इराणच्या आश्रयाला गेला असताना तिथे तो प्रसिद्धचित्रकार मीर सय्यद अली, आणि अब्दूस सबद यांच्या संपर्कात आला. त्यांना भारतात स्वतः बरोबर घेऊन आला आणि त्यांच्याकडून 'दास्ताने अमीर हमजा' हा ग्रंथ चित्रीत करुन घेतला. त्याचबरोबर अकबराला चित्रकलेचे शिक्षण देण्यासाठी याच इराणी चित्रकाराची नियुक्ती केली.

### *अकबरकालीन चित्रकलाः–*

सम्राट अकबराच्या काळात चित्रकलेचा प्रचंड विकास झाला. त्याला बालपणापासून चित्रकार आणि चित्रकलेविषयी आवड होती. त्याच्याच काळात मोगलचित्र कलेत प्रगल्भता आली. अकबर स्वतः चित्रकार होता. त्याने चित्रकलेला उत्तेजन देऊन त्यासाठी एक स्वतंत्र विभाग तयार केला आणि ख्वाजा अब्दुस समद या चित्रकाराची विभाग प्रमुख म्हणून नियुक्ती केली.[4]

अबुल फजलच्या 'ऐन–ए–अकबरी' या ग्रंथातून अकबराच्या काळातील चित्रकलेविषयीची माहिती मिळते. अबुल फजल म्हणतो – "अकबराच्या दरबारात जवळपास 100 चित्रकार होते. त्यात हिंदूची संख्या अधिक होती. मीर सय्यद अली, ख्वाजा अब्दूस समद, दसवंत, बसावन, केसू, लाल मुकुंद, फारुख मुश्की, मधू, महेश, जगन, तारा, खेमकरण, सावळ, हरवंश इ.

अकबर कालीन चित्रकलेत व्यक्ती चित्रणांवर अधिक भर होता. अकबरकालीन चित्रकलेबाबत डॉ. किशोर

आग्रवाल म्हणतात "अकबर कालीन चित्रशैलीत चित्रावलीतील प्रधान भाग काश्मिरी शैलीचा आहे आणि उर्वरित भाग राजस्थानीय इराणी शैलीचा आहे. अकबराच्या काळातील चित्रकला ही चित्रपट, ग्रंथ धारित चित्रे, व्यक्तीचित्रे, भित्तीचित्रे अशा चार भागात चित्रीत झाली होती. खऱ्या अर्थाने अकबराच्या काळात चित्रकला उर्जीत अवस्थेत पोहचून तिने उत्कृष्ट चित्रशैलीचे रुप धारण केले.

सम्राट अकबराच्या काळात मोगलकालीन चित्रकलेतील विदेशी गुण हळूहळू कमी होऊन ती पूर्णतः भारतीय बनली. अकबराने भारतीय चित्रकलेसाठी एक स्वतंत्र शाळा काढली. या शाळेत देशविदेशातून अनेक विद्यार्थी चित्रकला शिकण्यासाठी येत असत. हे विद्यार्थी भिन्न भिन्न जाती धर्माचे होते. त्यांच्यासमोर एकच आदर्श होता. तो म्हणजे उच्च दर्जाची चित्रे तयार करणे.[5]

### *जहाँगीर कालीन चित्रकला–*

मोगल बादशहा जहांगीरला चित्रकलेविषयी प्रेम आणि पारख होती. त्याच्याच काळात मोगल चित्रकला विकासाच्या कळसाला पोहोचली. जहांगीर आपले आत्मचरित्र 'तुझक – ए – जहाँगीरी' या ग्रंथात म्हणतो "कलेच्या क्षेत्रात माझी आवड आणि ज्ञान एवढे वाढले आहे की, माझ्यासमोर कसलीही कलाकृती आली तरी मी तात्काळ सांगू शकतो की ही आकृती कोणत्या चित्रकाराने बनवली आहे.''

जहांगीरच्या काळातील चित्रकलेच्या विकासाबाबत डॉ. रामनाथ म्हणतात – "बादशहा जहांगीरच्या संरक्षणात मोगल चित्रकला इराणी बंधनातून मुक्त झाली आणि नवीन क्षेत्रात तिचे मार्ग सुरु झाले.'' तर श्री रामकृष्णदास म्हणतात –"जहांगीरच्या काळात चित्रकलेबाबत मुघलशैलीने एक नवीन रस्ता तयार केला तिच्यात रुढीप्रियता न राहता अस्सलपणा आला.''[6]

जहांगीरच्या काळात अबूलहसन, मंसूर, आगारजा, मुहम्मद नादिर, मुहम्मद मुराद, बिशनदास, मनोहर, माधव, तुलसी, गोवर्धन हे प्रसिद्ध चित्रकार होते. जहांगीरचा काळ हा मोगल चित्रकलेच्या सुवर्णयुगाचा काळ होता. जहांगीरप्रमाणे नूरजहाँलाही चित्रकलेची आवड होती. जहांगीरच्या काळानंतर चित्रकलेला उतरती कला लागली.

### *शहाजहानकालीन चित्रकला–*

मोगलवंशात बादशहा शहाजहान हा स्थापत्यकलाप्रेमी होता. त्याने चित्रकलेला राजाश्रय दिला, परंतु त्याची मुख्य आवड स्थापत्य कला होती. शहाजहानच्या काळात आकृती चित्रण आणि रंगरंगोटी कमी झाली परंतु रेखाचित्र आणि बॉर्डर बनविण्यात प्रगती झाली. त्याच्या काळात फकीरउल्ला, मीर हाशिम, अनुप, चित्रा हे प्रमुख चित्रकार होते. शहाजहानच्या चित्रकलेबाबत पारसी ब्राऊन म्हणतो, ''शहाजहान गादीवर आल्याबरोबर चित्रकलेच्या पतनाला सुरुवात झाली.''

### *औरंगजेब कालीन चित्रकला –*

शहाजहाननंतर मोगल सम्राट औरंगजेब सत्ताधीश झाला. त्याने चित्रकलेला प्रोत्साहन दिले नाही. तो चित्रकलेचा विरोधक होता त्याने अनेक ठिकाणातील चित्रे जप्त केली. औरंगजेब चित्रकलेला इस्लामविरोधी मानत होता. त्याने अनेक चित्रकारांना दरबारातून हाकलून दिले. आणि मोगल कालीन चित्रकला ऱ्हास पावली.[7]

### *समारोप :–*

मोगल चित्रकलेला भारतीय इतिहासात गौरवपूर्ण स्थान आहे. ही चित्रकला (अकबर–जहांगीर) च्या काळात अतिउच्च शिखरावर पोहोचली होती. या काळात भिन्न–भिन्न चित्रे निर्माण झाली. बादशहांची चित्रे, दरबारी आणि शिकार चित्रे, बाग–बगीचे, फळे, फुले झाडे या काळात व्यक्तीचित्रांवर अधिक भर होता. हमजानामा, बाबरनामा, तिमूरनामा, रज्मनामा, शाहनामा, लिलावती, अकबरनामा या प्रसिद्ध ग्रंथात अनेक चित्रे प्रकाशित केली आहेत. पुस्तकांवर चित्र बनवने हे या चित्रशैलीचे खास वैशिष्ट्ये होते. या चित्रकलेचा सर्वात मोठा दुर्गण म्हणजे मानवी जनजीवनवर कसलीही चित्रे रेखाटलेली दिसत नाहीत.

### *संदर्भ सूचीः–*

1.भिडे गजानन, नलावडे विजय आणि नाईकनवरे वैजयंती : मध्ययुगीन भारत, फडके प्रकाशन, कोल्हापूर, सप्टें. 2002
2.मराठी वि. खेड (5) महा. राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई 1976
3.गुप्ता माणिकलाल, मध्यकालीन भारत का इतिहास, खंड (4) एटलांटिक पब्लिशर्स एण्ड डिस्ट्रीब्यूटर्स, नई दिल्ली,

1998
4.कदम य. ना. – प्राचीन व मध्ययुगीन भारत, फडके प्रकाशन, कोल्हापुर ऑग. 2008
5.परुथी आर. के. मुगलकालीन भारत अर्जुन पब्लिशिंग हाऊस, नई दिल्ली (2008)
6.परुथी आर. के. मुगलकालीन भारत अर्जुन पब्लिशिंग हाऊस, नई दिल्ली (2008)
7.गुप्ता माणिकलाल, मध्यकालीन भारत का इतिहास, खंड (4) एटलांटिक पब्लिशर्स एण्ड डिस्ट्रीब्यूटर्स, नई दिल्ली, 1998



Publish Research Article
International Level Multidisciplinary Research Journal
For All Subjects

Dear Sir/Mam,
We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.org